वाचले :-

१. धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण — २०१३.
२. मा.महापालिका सभा ठराव क्र.४७५ दि.२०/०२/२०१४.
३. आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५४९/२०१५ दि.०७/०५/२०१५.
४. आदेश क्र.प्रशा/२/कावि/२७१/२०१७ दि.१४/०६/२०१७.
५. मा.महापालिका सभा ठराव क्र.४२४ दि.०६/०९/२०२३.
६. मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.२२०५ दि.०६/०९/२०२३.
७.मा.आयुक्त यांचा दि.27/09/२०२३ चा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे -४११ ०१८.
वैद्यकीय विभाग (धन्वंतरी कक्ष),
क्र.वैद्य/१४अ/कावि/७३२/२०२३
दिनांक - /०९/२०२३ 27 SEP 2023

**विषय — पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यरत व सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक यांना धन्वंतरी स्वास्थ योजना - २०१३ लागू करणे बाबत...**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत व सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी यांना धन्वंतरी स्वास्थ्य योजना २०१३ लागू करणेत आलेली आहे. सदर योजनेच्या धोरणास मा.महापालिका सभेने ठराव क्र.४७५ दि.२०/०२/२०१४ तसेच मा.महापालिका सभा ठराव क्र.५४९ दि.१९/०८/२०१४ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदरची योजना पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी बंधनकारक आहे. व सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता ऐच्छिक करणेत आलेली आहे.

तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार सोमवार जुलै १, २०१३ तसेच उपरोक्त वाचले क्र.४ चे आदेशान्वये शिक्षण मंडळाच्या अखत्यारित असलेल्या प्राथमिक शाळांच्या सर्व जंगम मालमत्ता, स्थावर मालमत्ता व विविध बँकेतील सर्व खाती ही पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे वर्ग करणेबाबत आदेश निर्गत केलेले आहे. त्यामुळे शिक्षण विभागातील सर्व प्राथमिक शिक्षक व सेवानिवृत्त शिक्षक यांची सेवा महानगरपालिकेकडे वर्ग झाल्याने शिक्षण विभागाकडील आस्थापनेवरील कार्यरत / सेवानिवृत्त अधिकारी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांना उपरोक्त वाचले क्र.५ चे मा.महापालिका सभा ठराव व उपरोक्त वाचले क्र.६ चे मा.स्थायी समिती ठराव अन्वये शिक्षकांना धन्वंतरी स्वास्थ्य योजना लागू करणेस मान्यता दिलेली आहे. सदरची योजना पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत शिक्षक यांचेसाठी बंधनकारक आहे. व सेवानिवृत्त शिक्षक यांचेकरीता ऐच्छिक राहील.

त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत व सेवानिवृत्त शिक्षक यांची सभासद नोंदणी करणे आवश्यक आहे. त्याकरीता सोबत जोडलेल्या प्रतिज्ञापत्र (नमुना अ)

प्रमाणे सर्व संबंधित कार्यरत शिक्षक यांनी व सेवानिवृत्त शिक्षक यांनी सभासद नोंदणी प्रतिज्ञापत्र (नमुना ब) फॉर्म भरुन घेणेत यावेत. तसेच कार्यरत शिक्षक यांचेसाठी र.रु.३००/- दरमहाचे वेतनातून व सेवानिवृत्त शिक्षक यांचेसाठी र.रु.१५०/- पेन्शन मधून सभासद वर्गणी पोटी कपात करणेत यावी. व या हिश्श्याच्या दुप्पट रक्कम मनपातर्फे धन्वंतरी निधीमध्ये जमा करावी.

सबब, सदरचे परिपत्रक संबंधित शिक्षकांचे निदर्शनास आणून द्यावे. शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षकांचे फॉर्म भरुन त्याची एक प्रत (Hard Copy) अपलोड केलेले कागदपत्र व फोटो धन्वंतरी विभागास पाठवावी. तसेच सेवानिवृत्त शिक्षकांचे फॉर्म बाबतची पुर्तता लेखा विभागाने करावी.

(शेखर सिंह)
**आयुक्त,**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे — ४११०१८

**प्रति,**

**१.सहाय्यक आयुक्त,**
प्राथमिक शिक्षण विभाग

२/- सदरचा आदेश सर्व संबंधितांस निदर्शनास आणून, सभासद नोंदणीसाठी प्रतिज्ञापत्र, नमुना अ भरुन धन्वंतरी सभासद वर्गणी कपात करणेत यावी. व सर्व फॉर्म धन्वंतरी धोरण -२०१३ प्रमाणे आवश्यक त्या कागदपत्रांसह वैद्यकीय विभाग धन्वंतरी कक्षाकडे पाठविणेत यावेत.

**२.मुख्य लेखा व वित्त अधिकारी,**
लेखा विभाग

२/- प्राथमिक शिक्षण विभागाकडील सेवानिवृत्त शिक्षक यांचे फॉर्म नमुना ब भरुन घेवून सभासदत्वा बाबतची कार्यवाही करुन सभासद वर्गणी पेन्शनमधून कपात करणेत यावी.

**३.उप आयुक्त,**
सामान्य प्रशासन विभाग

२/- पिंपरी चिंचवड महानगरपालिके वेतन/पेन्शन संगणक प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करणेत यावा.

**४.मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी,**
माहिती व तंत्रज्ञान विभाग

२/- पिंपरी चिंचवड महानगरपालिके वेतन/पेन्शन संगणक प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करणेत यावा.

27/9/23

(डॉ.लक्ष्मण गोफणे)
**आरोग्य वैद्यकीय अधिकारी,**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे — ४११०१८.